# शिवरायांची चतुराई



म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय : बा.वा
दा. क्र. : २५०९४

BVBK-0402794

गति गोखले

प्रकाशिका :
सौ. सुप्रिया श्रीकांत डंके
पंढरी प्रकाशन
१६/२२४, लोकमान्य नगर,
पुणे ३०.

मुद्रक :
मा. वि. दात्ये
गणेश प्रिंटर्स
६९३, बुधवार पेठ,
पुणे २.

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन

प्राप्तिस्थान :
अरगडे आणि मंडळी
अप्पा बळवंत चौक,
पुणे ४११ ०३०.

प्रथमावृत्ती : जानेवारी १९८२
पुनर्मुद्रण : सप्टेंबर १९८६
: ऑगस्ट १९९१

टाईप सेटिंग :
व्हेन्चर डेस्कटॉप
अभिनंदन ब, ७५९/११९
प्रभात रोड गल्ली क्र. २, पुणे ४.

---

श्रीछत्रपति शिवाजीमहाराज म्हणजे आम्हाला दैवतासमान. शिवरायांची स्तुतिस्त्रोत्रं गाण्यात आम्हाला अपार आनंद आणि अभिमान वाटतो तो त्यामुळेच. बाळगोपाळांना हा श्रीशिवरायांचा आदर्श सतत स्फूर्तिदायी वाटत असतो. त्यासाठीच ही शिवचरित्रमाला गुंफली आहे. काही इतिहास, काही शिकवण, काही कथा अशा अनेक बाजूंनी ही माला सुशोभित केली आहे. अर्थात ती सारी श्रीशिवरायांच्या चरित्राचीच पुण्याई !

या पुस्तकात शिवाजीराजांनी स्वत:वर आलेल्या संकटातून बाहेर पडताना दाखविलेली चतुराई सांगण्याचा प्रयत्न केला आहे. कधी धाडस, कधी सावधानता, तर कधी असामान्य धैर्य यांचा उपयोग करून आपली चतुराई शत्रूला दाखवून देणारे श्रीशिवराय खरोखरच असामान्य बुद्धीचे होते यात शंका नाही !

लेखिका

## १ : अफझलखानाची स्वारी

विजापूरच्या दरबारात शिवाजीराजे भोसले यांच्या विषयी फारच तक्रारी येत होत्या. यापूर्वी शिवाजीराजांना शहाजी राजांकडून समजावण्याचा आणि छोट्या छोट्या सरदारांकडून धाक दाखवण्याचा प्रयत्न करून झाला होता; पण त्यात यश आले नव्हते.

एक बंडखोर मुलगा म्हणून शिवाजीराजांच्या उद्योगाकडे दुर्लक्ष करणे आता शक्य नव्हते. शिवाजीराजे आता आदिलशहाचे एक महत्त्वाचे शत्रू बनले होते. विजापूरच्या आदिलशाही दरबारात याविषयी सतत चर्चा होत होती. पण शिवाजीराजांचा बंदोबस्त कसा करावा हे ठरत नव्हते.

अखेर एक खास दरबार भरवला गेला. या दरबाराला हजर राहण्याची आमंत्रणे सगळ्या मोठ्या सरदारांना पाठविली गेली होती. त्याप्रमाणे सर्व सरदार हजर झाले. त्यावेळी आदिलशहाच्या सर्व सरदारांच्या चर्चेचा विषय एकच होता आणि तो म्हणजे शिवाजीराजे भोसले !

प्रत्यक्ष दरबारात आदिलशहाची आई बडी बेगमसाहेबा दरबारातल्या सरदारांना चिड यावी, त्यांना त्यांच्या पराक्रमाची लाज वाटावी असे टोचून बोलली. याचा चांगला परिणाम झाला. बेगमचे बोलणे सर्वांना झोंबले. पण एक सरदार मात्र चिडून ताडकन उभा राहिला. त्याचे नाव होते अफझलखान !

उंचापुरा, धिप्पाड शरीराचा, अतिशय पराक्रमी आणि राक्षसी ताकदीचा अफझलखान लांब लांब टांगा टाकत आदिलशहाच्या सिंहासनासमोर येऊन उभा राहिला. त्याने मुजरा

केला आणि तो म्हणाला -

'खुदावंत, हा बंदा जिंदा आहे तोवर आपल्याला फिकिर करायचं कारणच नाही. मी शिवाजी भोसलेला वठणीवर आणतो.'



अफझलखानाच्या या बोलण्याने आदिलशहा, बडी बेगम आणि दरबारातले सर्वजण खूष झाले. आदिलशहाने अफझलखानाच्या पराक्रमाची, धाडसाची आणि सामर्थ्याची स्तुती करून त्याला मानाचा विडा दिला. त्यावेळी खान पुन्हा म्हणाला, 'खाविंद, आपण काळजीच करू नका. त्या डोंगरातल्या उंदराला मी जिवंत पकडून किंवा ठार करून आपल्या पायाशी आणून टाकीन.'

अफझलखानाच्या बोलण्यात घमेंड होती तरी त्याची ताकदही तशीच मोठी होती. लगेच स्वारीची तयारी सुरू झाली. अफझलखानाला खूप मोठे सैन्य, तोफा आणि हत्ती मदतीसाठी

देण्यात आले. अनेक शूर सरदारही आदिलशहाच्या आज्ञेवरून खानाबरोबर निघाले.

अफझलखान प्रचंड फौजेसह विजापुराहून निघाला. त्याने वाटेत तुळजापूरची भवानी, पंढरपूरचा विठोबा या देवस्थानांची मोडतोड केली. यामागे आपल्या ताकदीचे प्रदर्शन करण्याचा आणि मराठ्यांना दहशत बसवण्याचा त्याचा हेतू होता.

शिवाजी राजांकडे अफझलखानाच्या स्वारीची बातमी आली. यावेळी खान फार मोठ्या तयारीने येत असून प्रसंग मोठा कठीण असल्याचे त्यांना कळले होते. शिवाजीराजे सहकाऱ्यांबरोबर सतत विचारविनिमय करत होते. अखेर शक्तीपेक्षा यावेळी युक्तीने काम साधण्याचे त्यांनी ठरवले.

अफझलखान देवस्थानांची मोडतोड करीत पुढे पुढे येत होता. त्याच्या हालचालींची माहिती हेरांकडून शिवाजीराजांना कळत होती. खान वाईला आपल्या फौजेचा तळ देणार असे कळले होते. त्यामुळे शिवाजीराजांनी आपला मुक्कामही राजगडावरून हालवून प्रतापगडावर नेला. सुरक्षितता आणि विचार करायला सवड अशा दुहेरी हेतूने राजांनी हा निर्णय घेतला होता.

अफझलखानाला कोठेच फारसा प्रतिकार झाला नाही. यामुळे त्याची घमेंड वाढत गेली. शिवाजी आपल्याला फार घाबरला आहे आणि आता तो प्रतापगडाकडे पळून गेला आहे असा खानाच्या मनाचा समज झाला. शिवाजीराजांनीही आपण खानाला घाबरतो आहोत अशा बातम्या मुद्दामच सर्वत्र

पसरविल्या होत्या. खान फौजेसह वाईला येऊन पोचला तेव्हा शिवाजीराजांनी खानाचे स्वागत करून त्याला नजराणाही पाठवला. खानाची हळूहळू खात्री होत चालली की शिवाजी भोसला आपल्याला खरंच फार घाबरून आहे.

शिवाजीराजांनी हेरांकडून खानाच्या फौजेची माहिती काढतानाच आपले घाबरण्याचे नाटक चालूच ठेवले होते. खानाशी लढण्यापेक्षा त्याचा युक्तीनेच नाश केला पाहिजे असा शिवाजीराजांचा विचार होता. खानाकडून 'भेटीला ये ' असा अपेक्षित निरोप आला. शिवाजीराजांनी आपल्याकडील एक चतुर आणि हुषार वकील पंताजी गोपीनाथ यांना आपले विचार व्यवस्थित समजावून देऊन खानाकडे पाठवले.

पंताजींनी खानाची भेट घेऊन शिवाजीराजे खानसाहेबांच्या सामर्थ्याला किती घाबरतात, खानसाहेबांना फार मानतात, खानसाहेबांच्या शब्दाबाहेर शिवाजीराजे जाणारच नाहीत, आपल्या चुका ते खानसाहेबांशी कबूल करतील, माफी मागतील इत्यादी अनेक गोष्टी सांगितल्या. पंतांनी याच कल्पना वारंवार ऐकवून खानाचं मन घमेंड आणि बेफिकिरी यांनी भारावून टाकलं. नंतर खानानं सांगितलेल्या बहुतेक गोष्टी मान्यही केल्या. पण खानाच्या भेटीला यायला मात्र राजे फार घाबरतात हा एकच मुद्दा त्यांनी खानाला सतत ऐकवला.

खान मनातून स्वत:वर खूष झाला होता. अशाच अवस्थेत त्याने पंतांची एक विनंती मान्यही करून टाकली. 'खानसाहेबांनीच प्रतापगडावर राजांच्या भेटीला आणि तेही

केवळ खान साहेबांनी एक दोन रक्षक बरोबर घेऊनच भेटीला यावं' अशी ती विनंती होती. आपल्या सर्व अटी निमूटपणे मान्य करणारा शिवाजी आपल्याला खरंच घाबरला आहे असे समजून, स्वत:च्या अफाट शक्तीची घमेंड बाळगणाऱ्या खानाने प्रतापगडावर जायचे मान्य केले.

शिवाजीराजांनी युक्ती-युक्तीने खानाला जाळ्यात पकडला होता. त्यांनी एकीकडे घाबरण्याचे नाटक चालू ठेवले तर दुसरीकडे आपल्या फौजेला जावळी खोऱ्याच्या रानात सज्ज करून ठेवले. अफझलखान आपल्या फौजेसह जावळीच्या खोऱ्यात आला म्हणजे पुढील कारवाई करायचे त्यांनी ठरवले.

अफझलखान आपल्या तोऱ्यात होता. शिवाजीराजांच्या युक्तीने फसला होता. तो फौजेसह जावळी खोऱ्यात प्रतापगडाच्या खाली येऊन उतरला. वकिलांच्या गाठीभेटी होता होता भेटीचा दिवस ठरला. प्रतापगडाच्या मुख्य भागाच्या खाली असलेल्या एका माचीवर भेटीची तयारी पूर्ण झाली.

अफझलखान अगदी थोडी माणसे घेऊन गडावर आला. शिवाजीराजे संपूर्ण तयारीनिशी पोषाखात चिलखत आणि हत्यारे लपवून भेटीला निघाले. त्यांच्या फौजेची पूर्ण सिद्धता होती तर खान आणि खानाची फौज बेसावध होती.

प्रत्यक्ष भेटीच्या वेळी खानाने शिवाजीराजांना आलिंगन देण्याच्या निमित्ताने मिठी घातली आणि राजांची मान दाबण्याचा प्रयत्न केला. त्याला आपल्या शक्तीचे प्रदर्शन करावयाचे होते. पण राजांनी सावध राहून आपली वाघनखे खानाच्या पोटात

खुपसून खानाला घायाळ केले. खानानं कट्यारीचा वार केला पण राजे चिलखतामुळे वाचले. राजांच्या चतुराईनं खानाचा डाव उलटला, तो ठार झाला.

'दगा-दगा' असे ओरडत खान कोसळला. गडावरून तोफा कडाडल्या. तो राजांच्या फौजेला इशारा होता. झाडीत लपलेल्या राजांच्या सैन्यात नेताजी पालकर, मोरोपंत पिंगळे यांच्या नेतृत्वाखाली खानाच्या फौजेवर हल्ला चढवला. खानाच्या फौजेला पळून जाणेही कठीण होते. मराठ्यांच्या फौजेने खानाच्या फौजेची धुळदाण उडवली. काही थोडे लोक पळाले तरी अनेकांना ठार केले गेले. खूप मोठी लूट मराठ्यांनी मिळवली.

अशा प्रकारे शिवाजीराजांनी शक्तीचा युक्तीने पराभव केला. यावेळी शिवाजीराजांवर फार मोठे संकट आले होते पण त्यांनी आपल्या चतुराईने त्या संकटावर मात केली.

** **

## २ : पन्हाळगडावरून पलायन

अफझलखान हा विजापूरकरांचा मोठा भरवशाचा सरदार होता. तो होताही पराक्रमी पण शिवाजीराजांनी त्याचा पूर्ण पराभव केला. विजापूरकर खूप चिडले होते. त्यांनी शिवाजीराजांना स्वस्थता मिळूनच द्यायची नाही असे ठरवले.

सिद्दी जौहर हा एक अत्यंत क्रूर पण तितकाच पराक्रमी सरदार होता. त्याला आदिलशहाने शिवाजीराजांवर पाठविले. यावेळी अफझलखानाच्या वधाचा सूड घेण्यासाठी त्याचा मुलगा

फाजलखान हाही जौहरबरोबर निघाला. सूडाची भावना आणि प्रचंड सैन्य घेऊन विजापूरकरांचे सरदार शिवाजीराजांच्या बंदोबस्ताला निघाले.

यावेळी शिवाजीराजे कोल्हापूरजवळच्या पन्हाळगडावर होते. हा किल्ला सरहद्दीवर असल्यामुळे त्याची डागडुजी करून तो मजबूत करण्याचे काम राजे स्वत:च्या देखरेखीखाली करून घेत होते.

सिद्दी जौहरने शिवाजीराजांवरील स्वारीची तयारी अतिशय गुप्ततेने व झटपट केली. त्याने अचानक येऊन पन्हाळगडाला वेढाच घातला. गडाकडे जाणाऱ्या सर्व रस्त्यावर फौजा पाठवून त्याने गडाची कोंडी केली. शिवाजीराजे गडावर कोंडले गेले.

शिवाजीराजांविषयींचा पूर्वीचा अनुभव लक्षात घेऊन सिद्दी जौहरने खूप सावधगिरी बाळगली होती. कुठेही ढिलाई न होता वेढा पूर्णपणे घातला गेला होता. त्याने स्वत: सर्व बंदोबस्त तपासून सैनिकांना सक्त ताकीद दिली होती. गडावरून खाली किंवा बाहेरून गडावर कोणीही जाणार नाही अशी त्याने व्यवस्था ठेवली होती.

शिवाजीराजांना ही घटना थोडी अचानक वाटली. त्यांनी गडावर उत्तम व्यवस्था केली असल्यामुळे त्यांना काळजी मात्र वाटली नाही.

सिद्दी जौहरने प्रथम गडावर हल्ले करून पाहिले पण गड मजबूत होता त्यामुळे त्याला यश मिळाले नाही. मग जौहरने वेढा मजबूत करण्यावरच आपले लक्ष एकत्र केले. शिवाजीराजांनीही

जौहरच्या वेढ्याची परिस्थिती पाहण्यासाठी मधून मधून सैन्याच्या टोळ्या पाठवून अंदाज घेण्याचा प्रयत्न केला होता. त्यावेळी त्यांनाही जौहरच्या शिस्तीचा आणि सावधगिरीचा अनुभव आला होता. आता शिवाजीराजांचे गडाबाहेर असलेले लोक जौहरच्या फौजेवर हल्ले करून त्याला जेवढा त्रास देत तेवढेच लढाईचे प्रसंग होत. एरवी फक्त वेढा घालून बसणे एवढेच काम जौहरची फौज करत होती.

शिवाजीराजांना बाहेरून मदत येईल ही आरंभी वाटणारी आशाही आता हळूहळू कमी होत चालली. कारण चार-पाच महिने झाले तरी तशी कोणतीच चिन्हे दिसत नव्हती. गडावर भरपूर अन्न-धान्य, दारूगोळा आणि सैन्य होते म्हणून आरंभी काळजी वाटली नाही तरी आता राजांनाही हळूहळू परिस्थिती गंभीर वाटू लागली होती. जौहरही हट्टाला पेटून बसल्याप्रमाणे वेढा कडक बंदोबस्तात ठेवून होता.

आता या परिस्थितीतून एकच मार्ग उरला होता तो म्हणजे गुप्तपणे पळून जाणे. अर्थात जौहरला फसवणे सोपे नव्हते. एकच शक्यता दिसत होती ती म्हणजे नुसता वेढा घालून महिनोमहिने एकाच ठिकाणी बसून जौहरचे सैनिक कंटाळले होते त्याचा फायदा मिळवणे. परंतु तरीही जौहरच्या धाकामुळे सैनिकात ढिलाई मात्र आली नव्हती. त्यामुळे एकूण परिस्थिती अवघडच होती.

अखेर राजांनी एक साहसी योजना आखली. या योजनेत खूप मोठा धोका होता. पण साहसाबरोबर चतुराईचा उपयोग करून

योजना आखण्याचा राजांनी विचार केला होता. आपल्या गडावरच्या सहकाऱ्यांशी विचारविनिमय करून राजे ही योजना पक्की करत होते.

अखेर योजना ठरली. गंगाधरपंत नावाच्या वकिलांनी जौहरकडे जाऊन शरणागतीची बोलणी सुरू करायची आणि राजांनी गुपचूप पळून जाऊन विशाळगड गाठायचा अशी ती योजना होती.

एका सकाळी पांढरी निशाणे पुढे करून गंगाधरपंत जौहरकडे गेले. शिवाजीराजांचा वकील आला म्हणून हुरळून न जाता जौहेर सावध राहिला. कारण पूर्वीचा अनुभव त्याच्या लक्षात होता. जौहरने बोलणी करताना आपल्याच अटी मान्य करायला लावल्या. शिवाजीराजांनी पालखीतून जौहरच्या छावणीत यावे. त्यावेळी राजांची कसून तपासणी होईल आणि मगच ते छावणीत प्रवेश करतील. त्यांनी शरणागती कबूल करून आमच्या स्वाधीन व्हावे. तोवर वेढा ढिला होणार नाही. अशा त्याच्या कडक अटी होत्या.

पावसाळा जवळ आला होता म्हणून गंगाधरपंतांनी बोलणी थोडी लांबवली. इकडे गडावरून कोणत्या वाटेने आणि केव्हा पळून जायचे याविषयी राजे स्वतः योजना तयार करत होते. राजांची योजना तयार झाली. पावसाळाही सुरू झाला. मग पंतांनी बोलणी संपवत आणली. जौहरही पावसाळ्यापूर्वी मोहीम संपणार या कल्पनेने खूष झाला होता. तसेच त्याचे सैनिकही कंटाळून पावसाच्या आधी ही मोहीम संपावी म्हणून वाट

पाहातच होते. त्यांच्या कामामध्येही त्यामुळे ढिलाई आली होती. शिवाजीराजांनी या सर्व परिस्थितीचा चतुराईने उपयोग करून घ्यायचे ठरवले.

आता, अगदी उद्या सकाळी शिवाजी भोसले गडावरून खाली येऊन शरणागती पत्करणार अशी सर्वत्र बातमी पसरली होती. थोडी ढिलाई वाढली होती. इकडे ती सकाळ येण्यापूर्वीच्या रात्री पन्हाळगडावर मात्र गुप्तपणे खूप हालचाल होत होती. निवडक माणसांची एक मावळ्यांची टोळी बाजी प्रभू देशपांडे यांच्या हाताखाली तयार करून देण्यात आली. एका कोपऱ्यातल्या वाटेनं ती माणसे अंदाज घेत गडाच्या उतारावरून खाली येत होती. त्यांच्याच सोबतीने शिवाजीराजेही गड उतरत होते.

अखेर पाहारे चुकवून ही मंडळी निसटली. विशाळगडाच्या रोखाने त्यांची वाटचाल होत होती. थोड्या वेळात जास्तीत जास्त अंतर कापण्याचा त्यांचा प्रयत्न होता. अंधार आणि पाऊस, भयभीत मने आणि अवघड रस्ता या सर्वांमुळे शिवाजीराजांना आणि त्यांच्या माणसांना वाट कापणे कठीण जात होते. पण अशाही परिस्थितीत शत्रूंना बातमी कळून त्याने पाठलाग सुरू करण्यापूर्वी विशाळगड गाठायचा होता. शेवटी विशाळगडाच्या आसमंतात असलेल्या एका खिंडीपाशी ही मंडळी आली. त्याचवेळी शत्रूच्या पाठलागाचीही चाहूल लागली. मग राजांनी बाजी प्रभूंच्याकडे खिंड रोखण्याचे काम सोपवून पुढे जाण्याचा विचार कायम केला. दुसरा काही मार्गच

२७८४

नव्हता !

अशा प्रकारे काही साहस आणि काही चतुराई यांचा उपयोग करून शिवाजीराजे पन्हाळगडावरून निसटले.

** **

## ३ : शायिस्तेखानाची फजिती

विजापूरच्या आदिलशहाने शिवाजीराजांविरुद्ध चालू केलेल्या मोहिमा उपयुक्त ठरल्या नाहीत. अफझलखानाचा वध झाला तर सिद्दी जौहर अपयशी ठरला. या सर्वू गोष्टींवर दिल्लीचा बादशहा औरंगजेब लक्ष ठेवून होताच. शिवाजीराजांसारखा एक मराठा वीर बलवान होत असल्याचे लक्षात येताच तोही शिवाजीच्या पारिपत्यासाठी उत्सुक झाला होता. त्यातच आदिलशहाने त्याची मदत मागितली. तेव्हा औरंगजेबाने आपला मामा शायिस्तेखान याला शिवाजीराजांवर पाठविले.

शायिस्तेखान हा अत्यंत अनुभवी, शूर आणि मोठा यशस्वी सरदार होता. तो प्रचंड फौज घेऊन शिवाजीराजांवर चालून आला. त्याने शिवाजीराजांच्या मुलखात प्रवेश करून अनेक ठिकाणे उध्वस्त केली. काही गड जिंकले. सर्वत्र दहशत निर्माण करण्यासाठी आपले सरदार ठिकठिकाणी पाठवले. त्याच्या फौजेचा असा धुमाकूळ चालू असताना शिवाजीराजे पन्हाळगडावर वेढ्यात अडकून पडले होते.

शायिस्तेखानाने हळूहळू शिवाजीराजांचा मुलुख जिंकत पुण्यापर्यंत धडक मारली. एवढेच नाही तर खानाने प्रत्यक्ष शिवाजीराजांच्या पुण्याच्या लालमहाल नावाच्या इमारतीत

मुक्काम ठोकला. शिवाजीराजांना पन्हाळगडातून निसटून बाहेर आल्यावर ही बातमी कळली तेव्हा त्यांना फार दुःख झाले. आता खानाला चांगला धडा शिकवायचा असा त्यांनी निश्चय केला. पण खानाजवळ असलेली प्रचंड फौज आणि त्याचा पराक्रम लक्षात घेऊन राजे उतावळेपणाने काही करणार नव्हते तर युक्तीने खानाचा काटा काढणार होते.

आता शिवाजीराजे राजगडावर येऊन पोहोचले होते. त्यांनी आपले प्रमुख सहकारी एकत्र केले. सर्वांना विचारून राजे एका चतुर योजनेची आखणी करत होते. खानाच्या पुण्याच्या फौजेची, तेथील चौक्या-पहाऱ्यांची आणि प्रत्यक्ष लालमहालातली सर्व बातमी ते गोळा करत होते. काही काळ शांतपणे विचार केल्यावर योजना पक्की झाली. या योजनेत धाडस होते आणि चतुरपणाही होता. योजना यशस्वी झाली तर शायिस्तेखानाची पुरती फजिती होऊन त्याला चांगला धडा मिळणार होता. त्यामुळेच योजना फार काळजीपूर्वक तयार केली जात होती.

चैत्र शुद्ध अष्टमीचा दिवस ठरला. योजनेप्रमाणे सर्व व्यवस्था करण्यात आली. जागोजाग माणसे आणि साहित्य पाठविण्यात आले. राजे स्वतः राजगडावरून अत्यंत गुप्तपणे निवडक माणसांबरोबर निघून गेले.

त्या दिवशी पुण्यात अंधाराबरोबरच एक लग्नाची वरात वाजत-गाजत शिरली. वरातीचा थाट फार चांगला होता. वाजंत्री वाजत होती. शोभेची दारू उडत होती. लेझमीचा ताफा खेळत


होता. दागदागिन्यांनी नटलेल्या बायका तोंडावर पदर ओढून चालल्या होत्या. पुरुषही नटून थटून शेले कसून बरोबर चालले होते. शायिस्तेखानाच्या सैन्यातले लोक आणि ठिकठिकाणचे पाहारेकरी ही 'लग्नाची वरात' पाहाण्यात दंग झाले होते. परंतु त्याचवेळी इकडे लालमहालाच्या स्वयंपाकघराच्या भिंतीला भोक पाडण्याचे काम चालू होते.

शायिस्तेखानाला आजवर सर्वत्र यश आल्यामुळे आणि त्याचा आपल्या पराक्रमावर फार विश्वास असल्यामुळे तो बराच बेफिकीर झाला होता. शिवाय त्याने पुण्यातील वाड्याचाच नव्हे तर सबंध पुणे गावचाच अगदी कडक बंदोबस्त करून सर्वत्र पाहारे बसवले होते. लालमहालात तो आपल्या कुटुंबासह ऐषारामात राहत होता. नाचरंग आणि मौज करत तो खुषीत राहिला होता.

शिवाजीराजांनी खानाच्या या अवस्थेचा नेमका फायदा उठवला. रात्रीच्या अंधाराचा, लग्नाच्या वरातीतील वाद्यांच्या आवाजाचा, पाहारेकऱ्यांच्या गाफीलपणाचा त्यांनी योग्य तो फायदा उठवला. राजे लालमहालात बालपणापासून राहिलेले होते. त्यांना वाड्यातली सर्व माहिती होती. स्वयंपाकघरातून त्यांनी आपल्या सहकाऱ्यांबरोबर प्रवेश केला. राजे स्वत: धाडसाने वाघाच्या गुहेत शिरले होते.

इकडे लग्नाची वरात जोरात चालली होती. तिकडे लालमहालात अचानक शिरलेल्या मराठा वीरांनी आपले काम जोरात सुरू केले. एकाएकी महालातले दिवे विझले. हे का

आणि कसे झाले याचा महालातल्या लोकांना पत्ता लागण्यापूर्वीच तिथल्या माणसांची कत्तल सुरू झाली. खानाचे नोकर, त्याचा जावई, खानाचा वडील मुलगा ठार झाले. 'दगा-दगा' अशा आरोळ्या उठल्या.



या गडबडीचा अंदाज येताच स्वत: खान आपला जीव वाचविण्यासाठी पळू लागला. त्याने महालाच्या खिडकीतून उडी टाकून पळून जाण्याचा विचार केला. तेवढ्यात तेथे पोचलेल्या शिवाजीराजांनी खानाच्या दिशेने तलवारीचा वार केला. खानाचे नशीब थोर ! त्याच्यावर राजांनी केलेल्या वाराने खानाची बोटे तुटली. पण खानाला जीव वाचवून पळता आले. जिवावर आलेले बोटावर भागले.

खान पळून जाताच राजे आपली माणसे घेऊन लालमहालातून बाहेर पडले. गुपचूप पसार झाले. ठराविक ठिकाणी येताच खुणेचे कर्णे वाजले. कात्रजच्या घाटात आधीच

आणून ठेवलेल्या बैलांच्या शिंगांना बांधलेले पलिते पेटले. बैल पळू लागले.

खानाला वाटले शत्रूच पळतो आहे म्हणून त्याने आपली माणसे पाठलागासाठी पाठवली. इकडे राजे दुसऱ्याच दिशेने जाऊन सिंहगडावर सुखरूप पोचले. खानाचे लोक थोड्या वेळाने कात्रजच्या घाटातले बैल पाहून हात हालवत परतले.

शायिस्तेखानाची पुरती फजिती झाली.

** **

## ४ : सुरतेची लूट

दिल्लीकर बादशहा औरंगजेब याने शिवाजीराजांवर शायिस्तेखानाला पाठवून त्यांची खोडी काढली होती. आता राजांनी दिल्लीकरांना एखादा धक्का द्यायचा ठरवले. स्वराज्यासाठी आता पुष्कळ पैशांची गरज होती. हा पैसा मिळविण्यासाठी आपण मोगलांच्या ताब्यातील एखादा प्रदेश लुटावा असे राजांच्या मनात आले. तेव्हा त्यांनी सुरत शहराची निवड केली. कारण सुरत हे त्याकाळचे मोठे व्यापाराचे केन्द्र होते. औरंगजेबाच्या राज्याचे ते नाकच होते. ते नाक कापून बादशहाला धडा शिकवण्याचे ठरले.

सुरतेमध्ये खूप श्रीमंत व्यापारी असून तेथील बाजारपेठांमध्ये भारी किंमतीचा खूप माल असे. तेथे पैशाची मोठी उलाढाल होत असे. सुरत शहरावर अचानक छापा घालायचा असे राजांनी ठरवले. अगदी आपल्या फौजेतही ही बातमी कळू दिली नाही. शिवाजीराजांनी आपल्या बहिर्जी नाईक या चतुर हेराला गुप्तपणे

सुरतेची माहिती काढायला सांगितले.

सुरतेमध्ये निरनिराळ्या वेषात गुप्तपणे फिरून बहिर्जींनि अत्यंत चोख कामगिरी बजावली. सुरतेतील श्रीमंत व्यापारी, तिथला सुभेदार, त्याचे सैन्य, तिथला बंदोबस्त याची त्याने माहिती मिळवून राजांना पोहोचवली. सुरतेमध्ये असलेल्या इंग्रजांसारख्या परदेशी व्यापाऱ्यांच्या वखारी आणि त्यांची गुदामे यांचा नेमका तपशीलही बहिर्जींनि राजांना पुरवला.

यानंतर शिवाजीराजांनी मोरोपंत पिंगळे आणि नेताजी पालकर या आपल्या सेनापतींबरोबर सुरतेवरील स्वारीचा बारीकसारीक तपशील निश्चित केला. सर्व काही अत्यंत गुप्तपणे चालू होते. एका चांगल्या मुहूर्तावर राजे आपल्या फौजेसह निघाले. आपण कोठे जात आहोत याचा कुणालाच पत्ता नव्हता. रात्री वाटचाल आणि दिवसा विश्रांतीसाठी एखाद्या आड जागी फौजेचा मुक्काम अशा पद्धतीने राजे सुरतेच्या दिशेने पुढे पुढे जात होते.

अचानक एक दिवस शिवाजीराजे फौजेसह सुरतेच्या वेशीवर येऊन थडकले. सर्वत्र पळापळ सुरू झाली. सुरतेचा सुभेदार इनायतखान गडबडून गेला आणि किल्लयातच दडून बसला. त्यामुळे सारे शहर राजांना मोकळे सापडले. शिवाजीराजांनी सुरतेच्या बाजारपेठा लुटायला आरंभ केला.

सुरत शहरातील लुटीत राजांनी एक धोरण ठरवले होते. श्रीमंत सावकारांकडे राजांचे सैनिक खंडणीची मागणी करत. जे निमूटपणे खंडणी देत त्यांना कोणी त्रास देत नसत. पण जे

खंडणीला नकार देत त्यांना मात्र शिक्षा करून त्यांचे सर्वस्व लुटले जाई. राजांनी आपली मुख्य छावणी गावाबाहेरच ठेवली होती. तेथे पैसे, रत्ने, सोन्याचांदीचे दागदागिने यांचे ढीगच्या ढीग पडू लागले. सहा दिवस ही लूट चालू होती. शहरातील गोरगरीब, धार्मिक मंदिरे यांना कोणीही त्रास दिला नाही.

या सुरतेवरील स्वारीमुळे राजांना प्रचंड लूट मिळाली. लाखो रुपयांची संपत्ती, उत्तमोत्तम दागिने, किंमतवान कापड अशी अनेक प्रकारची ही लूट होती. सोन्याच्या नाण्यांच्या राशीच जमा झाल्या होत्या. ही सर्व लूट एकत्र करून वाहून नेण्यासाठी अनेक हत्ती, घोडे आणि उंट वापरावे लागले.

शिवाजीराजे सुरतेच्या लुटीचा उद्योग झटपट आवरून तितक्याच झटपट आपल्या मुलखात परत येण्यासाठी निघाले. कारण ही लुटीची बातमी कळल्यावर औरंगजेब बादशहाची माणसे गप्प बसणार नाहीत याची त्यांना खात्री होती. त्यामुळेच जितक्या गुप्तपणे राजांनी स्वारीची आखणी केली होती तितक्याच गुप्तपणे ते आड रस्त्याने आपल्या मुलखाकडे परत आले.

औरंगजेब बादशहाचे नाक कापल्याच्या आनंदात मराठे वीर आपल्या मुलखात परतले. स्वराज्याची शक्ती वाढविण्यासाठी आता राजांना अमाप संपत्ती मिळाली होती. या संपत्तीचा उपयोग स्वराज्यासाठी करण्याचे ठरलेच होते. त्याप्रमाणे निरनिराळ्या किल्ल्यांची डागडुगी, शस्त्रांची आणि घोड्यांची खरेदी अशा गोष्टींना आरंभ झाला.

आता शिवाजीराजे म्हणजे एक बलवान आणि काळजी निर्माण करणारा शत्रू म्हणूनच त्यांच्याकडे विजापूरचा आदिलशहा आणि दिल्लीचा बादशहा औरंगजेब हे पाहू लागले.

शिवाजीराजांनी आपल्या चतुराईने दोघांनाही थक्क केले होते.

** **

## ५ : आग्र्याहून सुटका

शायिस्तेखानाची फजिती करणारा आणि सुरतेची लूट करणारा शिवाजी भोसले हा फारच शिरजोर होतो आहे असा शिवाजीराजांविषयीचा राग औरंगजेबाच्या मनात धुमसू लागला. या दक्षिणी मराठी पोराचा कायमचाच बंदोबस्त करून टाकला पाहिजे या विचाराने औरंगजेब बेचैन झाला होता. त्याने आपल्या दरबारातील सर्वात शूर आणि विचारी असा एक रजपूत राजा जयसिंह याला शिवाजीराजांवर पाठवायचे ठरवले. मिर्झाराजे जयसिंह यांच्या मदतीसाठी दिलेरखान नावाचा एक शूर पठाण सरदारही पाठवावा असे बादशहाने ठरवले.

खूप मोठी फौज, प्रचंड आकाराच्या तोफा, मुबलक पैसा वगैरे सामग्री देऊन बादशहाने आपल्या दोन सरदारांना दक्षिणेच्या स्वारीवर जाण्याची आज्ञा केली. दक्षिणेत असलेल्या बादशहाच्या सरदारांनाही पत्रे गेली. सर्वांनी एकजुटीने काम करून शिवाजीला धडा शिकवावा अशी बादशहाची आज्ञा होती.

मिर्झा राजे जयसिंह आणि दिलेरखान यांनी दक्षिणेत आल्याबरोबर शिवाजीराजांच्या मुलखात सर्वत्र एकदम हल्ले

करायला आरंभ केला. त्यांच्याजवळ प्रचंड फौज आणि अनेक सरदार असल्यामुळे त्यांना ते शक्य झाले. एवढ्या सर्व ठिकाणी एकदम प्रतिकार करण्याएवढे सैन्य आणि सामग्री शिवाजीराजांजवळ नव्हती. मोंगली फौजांनी सर्वत्र हाहाकार माजवला.

शिवाजीराजांच्या मुलखात सर्वत्र मोगली सैन्याचे तळ पडले. कित्येक ठाणी हातची गेली. किल्लयामागून किल्ले मोगलांनी जिंकले. बराच मुलूख हातचा गेला. जुन्नरचे ठाणे मोगलांनी काबीज केले. आता त्यांनी पुरंदर किल्लयाला वेढा दिला. शिवाजीराजांचा मुरारबाजी नावाचा एक शूर सरदार या किल्ल्यावर होता. त्याने शर्थ केली पण अखेर त्याला मरण आले आणि किल्लाही गेला.

अशा प्रकारे जयसिंह आणि दिलेरखान यांनी पराक्रमाची शर्थ करून शिवाजीराजांचे गड आणि ठाणी जिंकण्याचा सपाटाच लावला. प्रत्येक वेळी आपल्या शूर माणसांचे बळी देऊन आणि सैन्याचा नाश करून घेऊन मोगलांना प्रतिकार करत राहणे राजांना परवडणारे नव्हते.

अखेर शिवाजीराजांनी मिर्झाराजांशी तहाची बोलणी सुरू केली. राजांनी पुरंदरला तह केला आणि जयसिंहाच्या सर्व अटी निमूट मान्य केल्या. आता शरणागती पत्करण्यातच हित आहे असा राजांनी निर्णय घेतला होता. पण राजांची पुरती मानहानी करायचे ठरविलेल्या औरंगजेबाने तहाची एक अट म्हणून राजांना आपल्या भेटीला बोलावले. तेही राजांनी मान्य केले. परंतु या

भेटीत आपल्या जीवाला धोका होणार नाही याची त्यांनी जयसिंहाकडे हमी मागितली. जयसिंहाने तसे वचन देऊन आपला मुलगा रामसिंग याला राजांच्या संरक्षणाची कामगिरी सांगितली. रामसिंग उत्तरेतच औरंगजेबाच्या दरबारात होता.

शिवाजीराजे निवडक सैन्य अणि छोटे संभाजीराजे यांच्यासह उत्तरेत निघाले. औरंगजेब हा अत्यंत कपटी असल्यामुळे तो काय करील आणि काय नाही याची कोणालाच खात्री नव्हती. सर्वजण काळजीत पडले होते. पण साहस आणि चातुर्य या गुणांवर भरवसा ठेवून राजे सावधगिरीने तिकडे गेले. औरंगजेबाच्या दरबारात त्यांना हजर व्हायचे होते.

खूप लांबचा प्रवास संपवून शिवाजीराजे संभाजीसह आग्र्याला पोहोचले. तेथेच औरंगजेब त्यांची भेट घेणार होता. शिवाजीराजे प्रथम रामसिंगाकडे गेले. नंतर त्याच्यासह त्यांनी औरंगजेबाची भेट घेतली. पण या भेटीत औरंगजेबाने राजांना अत्यंत अपमानाची वागणूक दिली. मुद्दाम त्यांचा पाणउतारा केला. तेव्हा राजांना राग येऊन ते प्रत्यक्ष त्या दरबारातच रागावून बोलले आणि दरबार सोडून परतले.

औरंगजेब बादशहालाही शिवाजीराजांच्या वागण्याचा राग आला आणि त्याने ताबडतोब पोलादखान नावाच्या सरदाराकडून राजांच्या मुक्कामाला वेढा घालून त्यांना नजरकैद केले. शिवाजीराजे परक्या ठिकाणी येऊन शत्रूच्या तावडीत सापडले होते. इलाज नव्हता. त्यांनी खूप दिवस सारखा विचार केला. आता या कैदेतून सुटका कशी होणार ?

राजे खरोखरच चतुर आणि धीराचे होते. नुसते निराश होऊन बसण्यात अर्थ नव्हता. काहीतरी युक्ती लढवलीच पाहिजे हे त्यांना पटले होते. पुन्हा एकदा राजांनी खूप विचार केला आणि आपल्या चतुराईने यातूनही मार्ग काढायचे ठरवले.

काही दिवस कैदेत बसून विचार करण्यात घालविल्यावर राजांना एक युक्ती सुचली.

प्रथम राजे आजारी पडल्याचे सर्वांना भासविण्यात आले. वैद्यांची औषधे घेतली. हळू हळू आपल्या आजारपणात चढउतार होत असल्याचा देखावा राजांनी केला. हा आजारी शिवाजी काय गडबड करणार या विचाराने पाहारेकरी आणि पोलादखान थोडी ढिलाई करू लागले. तेवढ्यात राजांनी एक दिवस पोलादखानाला सांगितले की देवाच्या नावाने आम्ही आमच्या इथल्या मित्रांना आणि मोठ्या सरदार-मानकऱ्यांना मिठाई वाटणार आहोत. तेव्हा मिठाईचे पेटारे पाठविण्याची परवानगी द्यावी. पोलादखानाने परवानगी दिली पण त्याबरोबर आपल्या पहारेकऱ्यांना प्रत्येक पेटारा तपासून मगच सोडायचा असेही सांगून ठेवले.

त्यानंतर बरेच दिवस सारखे मिठाईचे पेटारे आत बाहेर जात राहिले. कित्येकदा पोलादखानाला आणि त्याच्या पहारेकऱ्यांनाही ही मिठाई मिळत होती. हळू हळू हा कार्यक्रम म्हणजे नित्याची बाब झाली. ते पेटारे तपासण्यात फारसा अर्थ नाही असा पहारेकऱ्यांचा समज झाला.

आता राजांच्या जवळ हिरोजी फर्जंद, मदारी मेहतर अशी

थोडीच मंडळी होती. त्यामुळेही काही गडबड अथवा दगाफटका होईल अशी कोणालाच भीती वाटत नव्हती. एक दिवस राजांच्या जागी हिरोजी झोपला आणि मदारी मेहतर त्याचे पाय चेपत बसला. राजे आणि संभाजी हे मात्र गुपचूप पेटाऱ्यांबरोबर बाहेर पडले, कोणाला कसलीच शंका आली नाही. कारण पहारेकऱ्यांनी डोकावून पाहिल्यावर राजेच झोपले असून एक पोरगा त्यांचे पाय चेपतो आहे असेच दृश्य त्यांना दिसले. त्यामुळे राजे पळाल्याची गोष्ट बराच काळ गुप्त राहू शकली.



शिवाजीराजांनी संपूर्ण योजना अत्यंत चतुरपणाने आखली होती. त्यांच्या योजनेप्रमाणे सर्व सुरळीत घडत गेले ही देवाची कृपा ! साहसी आणि चतुर माणसाला देवही मदत करतो म्हणतात तसेच यावेळी घडले. शिवाजीराजे आपल्या छोट्या संभाजीसह कैदेतून सुटले.

BVBK-0402794

२७९४
७।। ७।